# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 19 June 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १९ जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- प्रत्येक जिल्ह्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विकासाचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता विकसित मराठवाडा २०४७ या परिषदेतून व्यक्त.
- प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाच्या समर्थनात गंगाखेड तहसील कार्यालयासमोर सकल ओबीसी समाजाची निदर्शनं.
- जागतिक सिकलसेल दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमातून जनजागृती.

आणि

- वाशिम जिल्ह्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या १४ कृषी सेवा केंद्रावर कारवाई.

****

सर्वसमावेशक विकासाच्या नियोजनासाठी ‘जिल्हा’ हा महत्त्वाचा घटक मानून प्रत्येक जिल्ह्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विकासाचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी यांनी व्यक्त केली आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं ‘मित्र’, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या ‘विकसित मराठवाडा २०४७’ या एक दिवसीय विकास परिषदेत परदेशी बोलत होते. या कार्यक्रमाला प्रशासनाच्या विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठवाड्यात पाणी, कृषी, रोजगार, उद्योग आणि पर्यटन वाढीसाठीचं नियोजन आवश्यक असून, मित्र च्या माध्यमातून मराठवाड्यासाठी नविन धोरण तयार करून शासनाला शिफारस करण्यात येणार असल्याचं, परदेशी यांनी सांगितलं. खाजगी

गुंतवणुकीच्या वाढीसाठी प्रयत्न करणं आवश्यक असून, सकल उत्पादनात कमी सहभाग असलेल्या जिल्ह्यांना केंद्रीत करून त्यांचा सहभाग वाढवावा लागेल, याकडेही परदेशी यांनी लक्ष वेधलं.

****

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्रात भाजपाचे नेते असल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. ते आज नागपूर विमानतळावर बातमीदारांशी बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमध्येच राहून संघटनेला मदत करण्याची विनंती भाजपच्या सर्व आमदारांनी आणि पक्ष सदस्यांनी त्यांना केली असल्याचं, बावनकुळे यांनी सांगितलं. लोकसभेच्या निवडणुकीत जनतेने दिलेल्या पाठिंब्यासाठी भाजपा महाराष्ट्रात धन्यवाद यात्रा काढणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पक्षाचे प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी यांनी धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलतांना, राज्यातल्या सर्व ४८ लोकसभा मतदारसंघात ही अभिनंदन आणि धन्यवाद यात्रा काढण्यात येणार असल्याचं सांगितलं आहे.

****

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेना पक्षाचा आज ५८ वा वर्धापन दिन आहे. यानिमित्त पक्षाच्या वतीनं, आज मुंबईत मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे वरळीत तर उद्धव बाळसाहेब ठाकरे शिवसेनेचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे माटुंगा इथल्या षण्मुखानंद सभागृहात कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत.

****

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात नारायण राणे यांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करत विजय मिळवल्याचा आरोप करत, त्यांची निवड रद्द करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे एका नोटीशीद्वारे केली आहे. राणे यांना पाच वर्षांसाठी निवडणूक लढवायला आणि मतदान करायला बंदी घालावी अशी मागणीही त्यांनी केली असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यातील आणि केंद्रातील भाजप प्रणीत सरकारच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाच्यावतीने परवा २१ तारखेला राज्यातल्या सर्व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी

'चिखल फेक' आंदोलन केलं जाणार आहे. सरकारचं शेतकरी–कष्टकरी–अल्पसंख्याक याबाबतचं धोरण, स्पर्धा परीक्षांची अनियमितता, नीट परीक्षेतले कथित गैरप्रकार, शेतमालाला हमीभाव आदी मुद्द्यांवर सरकारच्या विरोधात हे आंदोलन केलं जाणार असल्याचं काँग्रेसच्या वतीनं सांगण्यात आलं आहे.

****

इतर मागासवर्ग – ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं उपोषणाला बसलेले राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या समर्थनार्थ परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेड इथं तहसील कार्यालयासमोर निदर्शनं करण्यात आली. राज्य सरकारने मागण्या मान्य कराव्यात अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा सकल ओबीसी समाजाच्यावतीने यावेळी देण्यात आला.

दरम्यान, हाके यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातून ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने आज वडीगोद्रीला रवाना झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

दहावा आंतरराष्ट्रीय योगदिन परवा साजरा होत आहे. योग हा निरंतर अभ्यासाचा विषय असल्याचं, धाराशिव जिल्ह्यातील कळंब इथले शशीकुमार भातलवंडे यांनी दाखवून दिलं आहे. २००५ पासून त्यांनी योग साधना करत, आतापर्यंत ५०० योग प्रशिक्षकांना तयार केलं असून दोन लाख विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षण दिलं आहे. त्यांच्या कार्याचा आमचे वार्ताहर देविदास पाठक यांनी आढावा घेतला...

**स्वतः प्रज्ञाचक्षू असून देखील योगसाधनेमध्ये त्यांनी सातत्य ठेवले आहे. या योग साधनेमुळे त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले आहेत. व्यसनमुक्ती, रोगमुक्ती यासाठी योगाभ्यासातून समुपदेशनाचे कामही ते करतात. योगशिक्षक शशी कुमार भातलवंडे यांनी अंधत्वावर मात करत सुरू ठेवलेली ही योगसाधना प्रत्येकाला आपल्या दैनंदिन दिनचर्येमध्ये योग साधना करण्याची प्रेरणा देत आहे.**

**–देविदास पाठक,आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव**

****

युवकांनी योग आत्मसात करून योगाचा प्रचार करावा असं मत माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केलं आहे. नांदेड इथं मल्टीमिडीया चित्रपट प्रदर्शनात ते बोलत होते. हे प्रदर्शन २१जूनपर्यंत सकाळी ९ ते सायंकाळी ६

वाजेपर्यंत सर्वांसाठी खुलं राहणार आहे, प्रदर्शनस्थळी तीन दिवस योग शिबाराचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव –मिफमध्ये आज पाचव्या दिवशी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेतले माहितीपट, तसंच शॉर्ट फिक्शन, बेलारूस, रशिया आणि फ्रान्स या देशांचे, तसंच ऑस्करसाठी निवडले गेलेले चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. आशियाई महिलांचे विशेष चित्रपट, दिव्यांगजनांसाठी तयार केलेले विशेष चित्रपटही पाहता येणार आहेत. याशिवाय लघुपट,ॲनिमेशन, माहितीपट, वेबसीरीज आणि ओटीटी मंच या विषयांवरची चर्चासत्रं, परिसंवाद आणि मार्गदर्शन सत्रंही होणार आहेत.

****

जागतिक सिकलसेल दिन आज सर्वत्र पाळला जात आहे. सिकलसेलचा प्रसार होऊ नये, यासाठी छत्रपती संभाजीनगर तालुक्यात चौका या गावातल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात आज जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अभय धानोरकर यांनी सिकलसेल या आजाराबद्दल उपस्थित नागरिकांना सविस्तर माहिती दिली, तसंच या नागरिकांनी रक्तपासणी करून या रोगाच्या एका पिढीतून दुसऱ्या पिढीत होणाऱ्या प्रसाराला आळा घालण्याचं आवाहन केलं...

**चाळीस वर्षाच्या आतील जेवढेपण पण नागरिक आहेत, महिला आणि पुरुष, त्या सगळ्यांनी सिकलसेलची रक्ताची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. कारण हा अनुवांशिकतेने आजार पसरतो. आजार आणि वाहक जे असतील, त्यांची टेस्ट पॉझिटीव्ह आल्यानंतर त्यांनी नॉर्मलम्हणजे जे वाहक नाही किंवा आजारी नाही अशा व्यक्तीशी लग्न केले तर ह्या आजाराला आपण तिथेच अटकाव आणु शकतो, म्हणचे हा पुढच्या पिढ्यामध्ये ट्रांसफर होणार नाही.**

****

वाशिम जिल्ह्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या १४ कृषी सेवा केंद्रावर भरारी पथकानं धडक कारवाई केली आहे. यापैकी आठ केंद्रांचे परवाने तात्पुरते तर तीन केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. उर्वरित कृषी सेवा केंद्रांना ताकीद देण्यात आली असल्याचं कृषी विभागातर्फे सांगण्यात आलं आहे.

****

पंढरपूरच्या आषाढी वारीत पायी पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पालखीमार्गावरील सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. आषाढी वारीच्या पूर्व नियोजनाबाबत सोलापूर इथं झालेल्या बैठकीत ते बोलत होते. पालखी तळांवर आवश्यक सोयी सुविधा तसंच सुरक्षेसाठी साडे २५ हजार अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, सार्वजनिक तसंच खाजगी अशी सुमारे २४ हजाराहून अधिक शौचालयं उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

****

दरम्यान, आषाढी वारीत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोबतचे मानाचे अश्व आज कर्नाटक इथल्या अंकली इथून आळंदीकडे रवाना झाले. हे अश्व अकरा दिवसांचा प्रवास करून २६ जून रोजी पुण्यात आणि त्यानंतर २८ जूनला आळंदीला पोचणार आहेत. माऊलींची पालखी २९ जूनला आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

****

आषाढी एकदशीसाठी पंढरपूरला निघालेल्या अकोला जिल्ह्यातल्या शेगांव इथल्या संत गजानन महाराजांच्या पालखीचं आज सकाळी १० वाजता वाशिम जिल्ह्यातील मेडशी इथं भव्य स्वागत करण्यात आलं. या पालखी समवेत ७०० वारकरी आणि पताकाधारी आहेत. या पालखीचे वाशिम जिल्ह्यात चार मुक्काम होणार असून आजचा पहिला मुक्काम डव्हा इथे होणार आहे.

****

परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यात धारासूर इथं वीज कोसळून मरण पावलेले अक्षय राठोड आणि येळेगाव इथले नरेंद्र शेळके यांच्या वारसांना राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत देण्यात आली. आमदार रत्नाकर गुट्टे आणि उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या हस्ते आज त्यांच्या कुटूंबीयांना मदतीचे धनादेश प्रदान करण्यात आले.

****